# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

**केंद्रीय कापूस संशोधन संस्था**

**नागपूर**

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 24-11-2023**

**नागपूर(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-11-24 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-11-25 | 2023-11-26 | 2023-11-27 | 2023-11-28 | 2023-11-29 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 11.0 | 22.0 | 26.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 30.5 | 29.6 | 28.1 | 27.1 | 26.5 |
| किमान तापमान (अं.से) | 17.5 | 18.5 | 19.0 | 18.5 | 17.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 70 | 70 | 67 | 70 | 75 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 50 | 50 | 45 | 45 | 50 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 1 | 2 | 8 | 10 | 12 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 95 | 90 | 95 | 100 | 95 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 3 | 5 | 6 | 4 |

### हवामान सारांश / चेतावणी:

हवामान सारांश: • नागपुर जिल्ह्यामध्ये, भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या जिल्हास्तरीय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २५ ते २९ नोव्हेंबर, २०२३ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • दिनांक २५ व २६ नोव्हेंबर २०२३ रोजी हवामान कोरडे राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक २७ नोव्हेंबर २०२३ रोजी तुरळक ठिकाणी खूप हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता, • दिनांक २८ व २९ नोव्हेंबर २०२३ रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • पुढील ५ दिवसादरम्यान, कमाल तापमान २६.५ ते ३०.५ अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १७.२ ते १९.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता, • सकाळची सापेक्ष आर्द्रता ६७.० ते ७५.० टक्के तर दुपारची सापेक्ष आर्द्रता ४५.० ते ५०.० टक्के राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये कमाल व किमान तापमानात पुढील ४-५ दिवसामध्ये फारसा बदल होणार नाही.

### कृषि सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता, आंतरमशागतीची कामे, कृषी रसायनांच्या (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकामध्ये खते कामे पुढील २ दिवसामध्ये उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. • पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील धान व इतर पिकांची कापणी व मळणी, बाजारायोग्य फळे व भाजीपाला पिकाची काढणी तसेच कापूस वेचणी ची कामे पुढील २ दिवसा मध्ये उरकून घ्यावी. • परिपक्व अवस्थेतील कापणी केलेले धान पिक शेतात पसरून ठेवले असल्यास शेतामध्ये उंचवटा ठिकाणी गोळा करून शेतमाल प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीच्या कामाला प्राधान्य द्यावे. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. वेचणी केलेला कापूस कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. • पावसाचा अंदाज लक्षात घेता रब्बी हंगामातील पिकांना (हरभरा, गहू, मोहरी, जवस इत्यादी) जमिनीतील ओलावा, पिकाची गरज बघूनच ओलीत करण्याचा निर्णय घ्यावा. पिक क्षेत्रामध्ये दिर्घकाळ पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. • विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्याव इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव व ट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. • स्थानिक हवामान अंदाज व सूचना यांचा अंदाज घेऊनच शेती कामाचे नियोजन करावे. पाऊस व मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, शेतकरी व शेतमजूर यांनी सुरक्षित ठिकाणी आसरा घ्यावा. शेतातील कामे शक्यतो सकाळच्या वेळी उरकून घेण्याला प्राधान्य द्यावे. • शेतमजुरांना शेतामध्ये एकत्रित समूहाने काम करू न देता दोन व्यक्तीमध्ये जास्तीत जास्त अंतर ठेवावे. शेतात आसरा घेताना पाण्याचे स्त्रोत (विहीर, तलाव, नदी इत्यादी), उंच ठिकाणे (झाडे, उंचवटे), धातूचे अवजारे या पासून जास्तीत जास्त अंतरावर आसरा घ्यावा.उंच ठिकाणांवर वीज आकर्षित होत असल्याने कोणत्याही परिस्थितीमध्ये झाडाखाली आसरा घेणे टाळावे. • पावसाचा अंदाज

### संक्षिप्त संदेश सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील धान व इतर पिकांची कापणी व मळणी, बाजारायोग्य फळे व भाजीपाला पिकाची काढणी तसेच कापूस वेचणी ची कामे पुढील २ दिवसा मध्ये उरकून घ्यावी.

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भात | • संभाव्य पावसाचा अंदाज लाक्षेत घेता, परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी करून शेतमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. • परिपक्व अवस्थेतील कापणी केलेले धान पिक शेतात पसरून ठेवले असल्यास शेतामध्ये उंचवटा ठिकाणी गोळा करून शेतमाल प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. |
| तूर | • पावसाचा अंदाज लक्षात घेता ओलीत करणे पुढील २-३ दिवस पुढे ढकलावे. • तूर पिकावर कळ्या व फुले अवस्थेत हेलीओथीस अळीचा प्रादुर्भाव असल्यास ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| मोहरी | • पावसाचा अंदाज लक्षात घेता ओलीत करणे पुढील २-३ दिवस पुढे ढकलावे. • पेरणीपासून २० व ४ दिवसानंतर २ निंदन व डवरणी करून कराव्यात. |
| गहू | • पावसाचा अंदाज लक्षात घेता ओलीत करणे पुढील २-३ दिवस पुढे ढकलावे. • बागायती उशिरा गहू पेरणीसाठी प्रती हेक्टरी १५० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. गहू पिकाच्या एचडी २१८९ किंवा पूर्णा यासारख्या जाड दाण्यांच्या वाणांसाठी बियाणे दर प्रती हेक्टरी १२५ किलो वापरावे. बागायती उशिरा पेरणीसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश या प्रमाणात रासायनिक खतांची मात्रा द्यावी. बागायती वेळेवर आणि उशिरा या दोन्ही पेरणीसाठी नत्राची अर्धी मात्रा तसेच संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळी द्यावे व उरलेली नत्राची अर्धी मात्रा पहिल्या पाण्याचे पाळीच्या वेळी (१८ ते २० दिवसानंतर) द्यावी. |
| कपाशी | • ज्या भागात कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीच्या कामाला प्राधान्य द्यावे. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. • कपाशीची जातवार स्वच्छ वेचणी करून कोरड्या जागेत कापूस साठवावा. • कपाशी मध्ये गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव व नुकसानीचे निरीक्षण करण्यासाठी यादृच्छिक पद्धतीने प्रती झाड एक बोंड या प्रमाणे २० बोंडे तोडून त्याचे निरीक्षण करावे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी [१० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या किंवा १० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त बोंडे] (२० बोंडापैकी किमान २ बोंडामध्ये पांढरी किंवा गुलाबी अळी किंवा अळी बाहेर पडण्याचे छिद्र असल्यास) गाठत असल्यास किंवा सतत ३ दिवसामध्ये ८ पतंग प्रती कामगंध सापळ्यामध्ये आढळून आल्यास प्रोफेनोफोस ५० ईसी३० मिली प्रती १० लिटर पाणी (१५०० मिली प्रती हेक्टर) किंवा ईमेमेक्टिन बेंझोएट ५ एसजी ५ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवाइंडोक्साकार्ब १४.५ एससी १० मिली प्रती १० लिटर पाणी (५०० मिली प्रती हेक्टर) किंवा क्लोरपायरीफॉस २० % ईसी २५ मिली प्रती १० लिटर पाणी (१२५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात मिसळून फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |
| कपाशी | • कपाशी पिकामध्ये पाते, फुले आणि बोंडे लागण्याच्या अवस्थेत आंतरिक बोंड सड या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आल्यास, व्यवस्थापनासाठी विकसित अवस्थेतील बोन्डाना चिकटलेल्या वाळलेल्या पाकळ्या गोळा करून शेताबाहेर नष्ट कराव्या. नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर टाळावा. कापूस पिकाच्या अतिरिक्त वनस्पती वाढीस प्रतिबंध करा. पिक क्षेत्रात पाणी साचू नये म्हणून शेतात पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करावा. या रोगास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्ल्यूपी २५ ग्राम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने बोंडे विकसित होण्याच्या सुरुवातीच्या फवारणी करावी. शिफारस केलेल्या कीटकनाशकांच्या फवारणीने रस शोषक किडीचे व्यवस्थापन करावे. • कपाशीच्या पिकावर टार्गेट लीफ स्पॉट, अल्टरनेरिया पानावरील ठिपके, मायरोथेसिम पानावरील ठिपके, बाह्य बुरशीजन्य बोंड सड या व्यवस्थापनासाठी रोगप्रतिबंधक फवारणी घेण्याचा सल्ला दिला जातो. प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५-३० ग्राम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्लू/डब्ल्यू एससी १० मिली किंवा फ्लूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्राम किंवा प्रोपीकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा पायराक्लोस्ट्रोबिन ५ % + मेटीराम ५५ % डब्ल्यूजी २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशी पिकातील दहिया रोगाच्या व्यवस्थापनासाठी, क्रेसोक्सिम-मिथाइल ४४.३ % एससी १ मिली किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी १० मिली किंवा प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५-३० ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्रॅम किंवा प्रोपिकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा पायराक्लोस्ट्रोबिन ५ % + मेटिराम ५५ % डब्ल्यूजी बुरशीनाशक २० ग्रॅम किंवा फ्लूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • गादीवाफ्यावर कांदा बियाणे हेक्टरी ८ ते १० किलो पेरावे. कांदा लागवडीसाठी पांढऱ्या कांद्याच्या जाती: अकोला सफेद, फुले सफेद, यशोदा, भीमा श्वेता आणि पुसा व्हाईट राउंड व लाल कांद्याच्या जाती: पुसा रेड, एन २-४-१, निफाड-५३ आणि बसवंत ७८० या वाणाची निवड करावी. |
| संत्रा | • पावसाचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्रि करावी. • आंबिया बहराच्या परिपक्व फळांची काढणी करावी. आंबिया बहराच्या फळ काढणीस उशीर होत असल्यास १५ दिवसाच्या अंतराने जिबरेलिक आम्ल १५ पीपीएम + १ % युरिया याची दोनदा फवारणी करावी. • आंबिया बहार घेण्यासाठी ओलीत थांबवून पाण्याचा ताण द्यावा. फळ काढणीनंतर मृत/जुनाट फांद्या काढून नष्ट कराव्या व त्यानंतर १ टक्के कार्बेन्डाझीम या बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| वांगे | • वांगी पिकावरील फळे आणि शेंडा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी साप्ताहिक अंतराने बॅसिलस थुरिंगिएन्सिस फॉर्म्युलेशन १ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • ट्रायकोग्रामा चिलोनिस अंडी कार्ड (२,५०,०००/हेक्टर) (५०,०००/रिलीज) ५ वेळा साप्ताहिक अंतराने, फुले लागण्याच्या सुरुवातीपासून) सोडावी. • प्रती एकर १० कामगंध सापळे लावावेत. • रासायनिक कीटकनाशकाद्वारे नियंत्रणासाठी क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी ०.३ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| टोमॅटो | • टोमॅटो पिकावरील फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी HaNPV 250 LE/ha सोबत 1 % गूळ सनस्क्रीन म्हणून लागवडीनंतर २८, ३५ आणि ४२ दिवसांनी संध्याकाळच्या वेळी फवारणी करावी. किडीचा तीव्र प्रादुर्भाव आढळून आल्यास १० ते १२ दिवसांच्या अंतराने ईमामेक्टिन बेंझोएट ५ एसजी ०.३ ग्राम प्रती लिटर पाणी किंवा इंडोक्साकार्ब ०.७५ मिली प्रती लिटर पाणी किंवा फ्लुबेंडियामाइड ०.१ मिली प्रती लिटर पाणी या पैकी कोणत्याही एका कीटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. • टोमॅटो पिकावरील टूटा नागअळी (Tuta absoluta) या किडीच्या व्यवस्थापनासाठी प्रकाश सापळा आधारित एकात्मिक कीड नियंत्रण अवलंबावे यासाठी ६० Watt चे प्रती एकरी ४ ते ५ इन्कॅन्डेसेंट लाईट बल्ब सापळे बसवावे. • प्रौढांच्या निरीक्षणासाठी प्रती एकर ४ ते ६ तुटा कामगंध सापळे लावावे. • रासायनिक पद्धतीने व्यवस्थापनासाठी इंडोक्साकार्ब १४.५ एससी ०.७५ मिली प्रती लिटर पाणी किंवा स्पिनोसॅड ४५ एससी ०.३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. • मिरीड बग, नेसिडिओकोरिस टेनुइस सारख्या नैसर्गिक शत्रूंना प्रोत्साहन द्या. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| म्हैस | • जनावरांसाठी पोषक चारा उपलब्धतेसाठी लुसर्न आणि बरसीम या चारा पिकाची लागवड करावी. जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३ महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी. |

## कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| चिक | • पक्षांना सकस आहार तसेच स्वच्छ व थंड पाण्याची व्यवस्था करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • शेतकरी बांधवांनी मेघगर्जना आणि आकाशात विजा चमकत असतांना घ्यावयाची काळजी: जर तुम्ही शेतात काम करीत असाल तर शेताजवळील ताबडतोब आश्रय घ्यावा. शेतातील सुरक्षित ठिकाणाचा आसरा घेतल्यानंतर पायाखाली कोरडे लाकूड, प्लास्टिक, गोणपाट, कोरडा पालापाचोळा ठेवावा. तुमचे दोन्ही पाय एकत्र करून गुडघ्यावर दोन्ही हात ठेवून तळपायावर बसावे. तुमच्या पायाव्यतिरिक्त शरीराचा अन्य कुठलाही भाग जमिनीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. जमिनिमध्ये ओलावा असलेल्या ठिकाणी किंवा पाण्याच्या स्त्रोतामध्ये जसे कि, तलावात काम करणाऱ्या व्यक्तींनी ताबडतोब सुरक्षित आणि कोरड्या ठिकाणी जावे. जवळपास उंच झाडे असतील तर त्या झाडाच्या उंचीपेक्षा दुप्पट उंचीच्या अंतरावर आश्रय घ्यावा. • विजांच्या बचावापासून पक्के घर हे सर्वात सुरक्षित ठिकाण आहे. शेतकऱ्यांनी आपले घर तसेच जनावरांचा गोठ्याच्या आजूबाजूला शक्यतो कमी उंचीची झाडे लावावीत. ओलावा असलेले, दलदलीचे ठिकाण तथा पाण्याचे स्तोत्र (विहीर, तलाव, नदी, शेत तालाव ई.) पासून शक्यतो दूर राहावे. चारचाकी वाहनातून प्रवास करीत असल्यास वाहनातच थांबावे. शेतकरी बांधवांनी त्यांच्याजवळ धातूचे कुठलेही उपकरण नसावे याची दक्षता घ्यावी. शेतामध्ये काम करतांना एकाच वेळी जास्त व्यक्तींनी एकत्र काम करू नये. दोन व्यक्तीमध्ये किमान १५-२० फूट अंतर राहील याची काळजी घ्यावी. धातूची दांडी असलेल्या छत्रीचा वापर करू नका. शेतकऱ्यांनी विजेवर चालणारी तसेच धातू पासून बनलेल्या इतर कृषी अवजारांपासून दूर रहा. |
| सामान्य सल्ला | • हवामान आधारित कृषी सल्ला पत्रिकेमध्ये नमूद तारखांची वैधता हि नमूद तारखेच्या सकाळी ०८:३० वाजेपर्यंत असेल, याची नोंद घ्यावी. * संशोधनावर आधारित शिफारस. दोन किंवा त्यापेक्षा अधिक रसायने किंवा संजीवके एकत्र मिसळू नये. |
| सामान्य सल्ला | • रोपवाटीकेतील वांगी, टोमाटो, फुलकोबी व पानकोबीचे ४ ते ६ आठवडे वयाची रोपांची शेतात लागवड करावी. मेथी, पालक, कोथिंबीर, मुळा व गाजर याची टप्प्याटप्प्याने लागवड करावी. |